रे.मु.क्र.८८८/२०१६
नि.७३ लगत जोड.

**<u>प्रतिवादीतर्फे सा.क्र.१ यांचा उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.आर.एम. संकलेचा यांच्यामार्फतः</u>**

दाव्यात नमुद केलेली वंशावळ बरोबर आहे. दाव्यात नमुद केलेल्या मिळकतींचे वर्णन व त्यांचे जिरायत किंवा बागायत असे नमुद केलेले स्वरुप चुकीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की गट नं.१२४ मध्ये असलेली विहीर समाईक आहे.

प्रश्न- गट नं.१०८ मधील विहीर समाईक आहे?

उत्तर- मला गट नं.१०८ हाच माहीत नाही.

हे म्हणणे खरे आहे की गट नं.१०८ बाबत मी आजपावेतो माहीती घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की गट नं.१७० मधील विहीर व त्यावरील इलेक्ट्रीक मोटर व पाईपलाईन ही ज्ञानदेव, शोभा व योगेश यांच्या स्वतंत्र मालकीची आहे.

प्रश्न- गट नं.१७० चे खरेदीखत हे कोणाच्या नावे आहे?

उत्तर- ज्ञानदेव बाबुराव आंधळे यांच्या नावे आहे.

प्रश्न- गट नं.१७० मधील मिळकतही लक्ष्मण तुकाराम उंडे यांच्याकडुन दि.२८.४.१९८० रोजी खरेदीखतान्वये रक्कम रु.९०००/- ला वादी नं.१ च्या नावे खरेदी घेतली आहे?

उत्तर- खरेदीसाठी रक्कम मी दिली होती. ती रक्कम मी मुंबईवरुन पाठवली होती.

हे म्हणणे खरे नाही की गट नं.१७० मधील मिळकतही एकत्र हिंदु कुटुंबाच्या शेतीच्या उत्पन्नातुन खरेदी घेतली होती.

प्रश्न- गट नं.१७० चे खरेदीखत तुम्ही पाहीलेले नाही?

उत्तर- मी पाहीलेले नाही कारण माझ्या वडीलांनी मला ती जमिन कोणाच्या नावे खरेदी करायची आहे असे विचारले असता मी सांगितले की वादी हा माझा भाऊ शेतकरी आहे म्हणुन ही खरेदी त्याच्या नावावर करायची.

मी गट नं.१७० ची जमिन ही माझ्या वडीलांना माझा भाऊ वादी शेतकरी आहे म्हणुन त्याच्या नावावर करायची असल्याबाबत सदरील माहीती मी कैफीयत देताना माझ्या वकीलांना सांगितली होती. खरेदीखताची रक्कम रु.९०००/- होती.

खरेदीखताची रक्कम मी दिल्याबाबत माझ्याकडे तोंडी शब्दांशिवाय इतर पुरावा नाही. मी सांगतो की तो पुरावा माझा भाऊ रामदास याच्याकडे होता व तो आता मयत आहे.

प्रश्न- खरेदीखत केल्यापासुन ते आजपावेतो तुम्ही खरेदीखताची नक्कल काढली नाही?

उत्तर- मला त्याची गरज पडली नाही.

माझे शिक्षण एस.एस.सी. पर्यंत झाले आहे व मला इंग्रजी आणि मराठी चांगले लिहीता वाचता येते. सदरचा दावा दाखल केल्यावर मी गट नं.१७० बाबत खरेदीखताची नक्कल पाहीली नाही. हे म्हणणे खरे आहे की गट नं.१७० च्या खरेदीखताबाबत गावदप्तरी फेरफार क्र.१८१ अन्वये वादीच्या नावे नोंद झाली. हे म्हणणे खरे आहे की फेरफार क्र.१८१ बाबत सदरच्या दाव्या व्यतिरीक्त मी कुठे तो फेरफार आव्हानीत केला नाही.

प्रश्न- गट नं.१७० च्या खरेदीखतात नमुद केलेली रक्कम बाबत तुमच्याकडे पुरावा काय आहे?

उत्तर- मी माझ्या मोठया भावासोबत ट्रान्स्पोर्ट व्यवसाय करायचो. खरेदी घ्यायला मोठा भाऊ रामदास गावी यायचा व गट नं.१७० ची जमिन रामदासला स्वतःच्या नावे खरेदी घ्यायची होती म्हणुन वडीलांनी मला मी मुंबईला असताना फोन केला होता व खरेदी कोणाच्या नावावर करायची असे विचारले होते. तेव्हा मी सांगितले होते की माझा भाऊ वादी हा शेतकरी आहे म्हणुन ही खरेदी त्याच्या नावावर करायची.

हे म्हणणे खरे नाही की गट नं.१७० च्या खरेदीखताची रक्कम व त्या जमिनीत विहीरीवर पाईपलाईन व इलेक्ट्रीक मोटर बसवण्यासाठीचा खर्च मी माझ्या ट्रान्स्पोर्ट व्यवसायातुन केल्याचे मी खोटे सांगत आहे. मी माझ्या मुंबईच्या ट्रान्स्पोर्ट व्यवसायाचे सर्व हिशेब ठेवले आहे.

प्रश्न- गट नं.१७० च्या खरेदीखताबाबत तुम्ही रु.९०००/- दिल्याबाबत तुमच्याकडे ट्रान्सपोर्ट व्यवसायाच्या हिशेबात नोंद नाही?

उत्तर- सदरच्या खरेदीखताची रक्कम देताना माझा मोठा भाऊ सगळा ट्रान्स्पोर्ट

व्यवसाय बघायचा व मी त्यावेळी लहान होतो.

मी माझा स्वतःचा ट्रान्स्पोर्ट व्यवसाय १९८६ साली चालु केला. हे म्हणणे खरे नाही की ट्रान्स्पोर्ट व्यवसायात मी रामदासला मदत करत असल्याबाबत माझ्याकडे तोंडी शब्दांशिवाय कागदोपत्री पुरावा नाही.

प्रश्न- तुम्ही रामदासला खरेदीखतासाठी रु.९०००/- दिल्याबाबत तुमच्याकडे लेखी पुरावा आहे का?

उत्तर- माझ्याकडे पुरावा नाही कारण आमचा व्यवसाय एकत्र होता.

हे म्हणणे खरे आहे की ट्रान्स्पोर्ट व्यवसायाचे लायसन्स रामदासच्या नावे आहे.

प्रश्न- तुमच्याकडे रामदासला पैसे दिल्याबाबत लेखी पुरावा आहे तर तुम्ही तो पुरावा केसमध्ये का दाखल केला नाही?

उत्तर- मी लहान होतो व माझा मोठा भाऊ रामदास ट्रान्स्पोर्ट व्यवहार बघायचा व आम्ही दोघे एकत्र व्यवसाय करायचो मा माझा मोठा भाऊ ट्रान्स्पोर्टचा व्यवसायाचा प्रोप्रायटर होता.

माझा सन १९८६ ते २००३ पावेतो श्रीहरेश्वर ट्रान्स्पोर्ट कॉर्पोरेशन नावाने व्यवसाय होता. मी माझ्या ट्रान्स्पोर्ट व्यवसायाचे सगळे जमाखर्चाचे हिशेब लिहुन ठेवले आहे. हे म्हणणे खरे नाही की रामदासने खरेदीखतासाठी रु.९०००/- दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की रामदासने ते रु.९०००/- दिल्याबाबत त्याचे लेखी टिपण किंवा नोटस केले असल्याबाबत ते माझ्या पाहण्यात आले नाही. हे म्हणणे खरे आहे की रामदास व मी जो ट्रान्स्पोर्ट व्यवसाय करायचो त्याचेदेखील जमाखर्चाचे हिशेब ठेवले होते. मी माझ्या भावासोबत ट्रान्स्पोर्ट व्यवसायात सन १९७५ ते सन १९८७ पावेतो होतो. हे म्हणणे खरे नाही की मी माझ्या भावासोबत ट्रान्स्पोर्ट व्यवसाय करत असल्याबाबत मी खोटे सांगत आहे. रामदास सोबतच्या एकत्रीत व्यवसायाचे जमाखर्च रामदासकडे होते कारण मी त्यावेळी लहान होतो.

हे म्हणणे खरे नाही की गट नं.१७० ही जमिन वादी क्र.१ च्या नावे एकत्र हिंदु कुटुंबाच्या शेतीच्या उत्पन्नातुन खरेदी घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की गट नं.८७५ मधील जमिन माझा मोठा भाऊ मयत रामदास याने भास्कर आंधळे व बाळु

आंधळे यांच्याकडून रजिस्टर्ड खरेदीखताने दि.२१.३.१९८० रोजी रक्कम रु.२०००/- ला खरेदी घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की त्या खरेदीखतान्वये रामदासची फेरफार क्र.१७८ अन्वये मालकीहक्क सदरी नोंद झाली. हे म्हणणे खरे नाही की रामदासच्या नावे सदरची मिळकत एकत्र हिंदु कुटुबाच्या उत्पन्नातुन घेतली. मी सांगतो की ट्रान्सोर्ट व्यवसायातुन घेतली. हे म्हणणे खरे आहे की ट्रान्स्पोर्ट व्यवसायातुन रामदासच्या नावे सदरची मिळकत खरेदी घेतल्याबाबत माझ्याकडे तोंडी शब्दांशिवाय पुरावा नाही. मी सांगतो की माझ्याकडे रामदासचे खरेदीखत आहे, सुलेनामा आहे. हे म्हणणे खरे आहे की गट नं.८७५ मधील मिळकत रे.मु.नं.७४६/२०११ मधील दावा दाखल केल्यानंतर त्यामध्ये सुलेनामा झाल्यावर माझ्याकडे आली. हे म्हणणे खरे आहे की सुलेनामा होण्याअगोदर मी फेरफार क्र.१७८ कुठे आव्हानीत केला नाही. हे म्हणणे खरे नाही की बाबुराव बाळाजी आंधळे दि.६.२.२००९ रोजी मयत झाले. हे म्हणणे खरे नाही की बाबुराव यांची पत्नी दगडाबाई बाबुराव मयत झाल्याच्या ३-४ वर्षानंतर वारली. मी सांगतो की ४ महीन्याने वारली. हे म्हणणे खरे आहे की रामदास सन २०१२ साली वारले. हे मला आठवत नाही की सन २००७-२००८ साली त्यांची पत्नी यशोदाबाई वारली.

प्रश्न- गट नं.१२४, १२६, २९०, २९२, ३०४, ३०८, ११४५, ८७७ व ७३८ या वडीलोपार्जीत जमिनी आहेत?

उत्तर- गट नं.७३८/१९ सोडुन वरील नमुद मिळकती वडीलोपार्जीत आहेत व गट नं.७३८/१९ ही रामदासला महाराष्ट्र शासनाकडुन आलेली जमिन आहे.

हे म्हणणे खरे आहे की गट नं.१७०, १७१, १७५, ३११, ८७५ या जमिनी खरेदीखताच्या आहेत. मी सांगतो की गट नं.९२६ वडीलोपार्जीत आहे.

उलटतपास मध्यान्हापर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत,

NILESH SHRIPAL SABNIS
Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2026.04.06 18:01:23 +0530

दिनांक : ०६/०४/२०२६

( डॉ.एन.एस.सबनीस )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारनेर

**<u>उलटतपास मध्यान्हानंतर शपथेवर पुन्हा सुरुः</u>**

हे म्हणणे खरे आहे की टाकळी ढोकेश्वर येथील गट नं.९२६ पैकी २ आणे ८ पै ही जमिन माझे वडील बाबुराव आंधळे यांचे नावे होती वती जमिन आजही त्यांच्या नावे आहे. हे म्हणणे खरे आहे की गट नं.९२६ पैकी सदरची जमिन ही वडीलोपार्जीत असल्यामुळेच माझ्या वडीलांच्या नावे आहे. हे मला माहीत नाही की वादी ज्ञानदेव यांनी त्यांचे नावावरील गट नं.१७० चे ७/१२ उता-याच्या मालकीहक्क सदरी कौटुंबिक सोयीसाठी वादी नं.२ शोभा ववादी नं.३ योगेश यांच्या नावावर तलाठीकडे अर्ज करुन फेरफार क्र.४५१ ने नोंद करुन दिल्या. हे म्हणणे खरे आहे की गटनं.१७० च्या ७/१२ उता-यावर मी तो उतारा काढल्यावर मला फेरफार क्र.४५१ ची नोंद दिसुन आली. हे म्हणणे खरे आहे की फेरफार क्र.४५१ ला आव्हानीत करण्याची मला गरज पडली नाही. हे म्हणणे खरे आहे की गट नं.१७१ व १७५ या जमिनी माझी आई दगडाबाई यांच्या नावे खरेदी घेतल्या होत्या व गट नं.३११ मधील संपुर्ण क्षेत्र माझ्या वडीलांच्या नावे खरेदी घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की गट नं.१७१, १७५ व ३११ या जमिनी एकत्र हिंदु कुटुंबाच्या उत्पन्नातुन खरेदी घेतल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की मयत बाबुरावच्या नावावरील सर्व जमिनींवर फेरफार क्र.२४७४ अन्वये त्यांचे सर्व मुलांची व मुलींची ते मयत झाल्यावर वारसाहक्काने नोंद झाली. हे म्हणणे खरे आहे की बाबुरावच्या नावावर असलेल्या मिळकतींबाबत आमच्यामध्ये वाटप झालेले नाही. मी सांगतो की २ मिळकती गट नं.१२६ व ३११ मध्ये वाटप झालेले आहे. फेरफार क्र.२४७४ मी पाहीला आहे.

प्रश्न- बाबुरावच्या वडीलोपार्जीत मिळकती सोडुन त्यांच्या खरेदी मिळकतींबाबत तुमच्यामध्ये आपसात वाटप झालेले नाही?

उत्तर- सुलेनामा करुन त्या मिळकती माझ्या नावावर करुन दिलेल्या आहेत.

हे म्हणणे खरे आहे की गट नं.११४५, १२६, १२४, ३०४, ३०८, २९०, २९२ व ८७७ या मिळकती माझ्या वडीलांच्या वडीलोपार्जीत मिळकती आहेत. मी सांगतो की गट नं.१२६ माझ्या नावे व रामदासची पत्नी आणि रामदासच्या मुलांच्या नावांवर वडीलांनी तलाठयाला अर्ज देवुन केला. (साक्षीदारास वारंवार सांगुनही

साक्षीदार पुर्ण प्रश्न ऐकुन घेत नाही व प्रश्न विचारत असताना मध्येच उत्तरे देत आहे).

प्रश्न- गट नं.१२६, ३११ आणि ११४५ या जमिनी मयत रामदासची पत्नी व मुले व प्रतिवादी क्र.४ पुष्पा नलवडे यांच्या नावे तलाठयाकडे अर्ज देवुन फेरफार क्र.४५० ने करुन दिल्या?

उत्तर- त्या जमिनी रामदासची पत्नी व मुले व मांझ्या नावे करुन दिल्या होत्या. त्या पुष्पा नलावडेच्या नावे करुन दिल्या नव्हत्या.

गट क्र.१२६ हा रामदासची पत्नी व मुले व माझ्या नावे तलाठयाकडे अर्ज देवुन केला होता व गट नं.३११ हा केवळ रामदासची पत्नी व मुले यांच्या नावे केला होता आणि गट नं.११४५ हा वडीलोपार्जीत गट आहे. हे म्हणणे खरे आहे की गट नं.११४५, १२६, १२४, ३०४, ३०८, २९०, २९२, ८७७ या जमिनी फेरफार क्र.२६६ ने बाबुराव आंधळे यांच्या नावे करुन दिल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की बाबुराव मयत असेपर्यंत त्यांची पत्नी व मुलांचे एकत्र हिंदु कुटुंब होते व त्यांच्या मृत्युनंतर देखील एकत्र हिंदु कुटुंब होते. हे म्हणणे खरे नाही की बाबुराव मयत होईपावेतो एकत्र हिंदु कुटुबाच्या वडीलोपार्जीत जमिनीतुन समाईकरित्या उत्पन्न घेत होतो.

प्रश्न- दावा मिळकतींबाबत तुमच्यामध्ये लेखी वाटप किंवा तुम्ही तलाठयाकडे अर्ज दिला असे काही झाले का?

उत्तर- अद्याप वाटप झालेले नाही.

रे.मु.नं.७४६/२०११ मध्ये ज्या दावा मिळकती होत्या त्याबाबत मी त्या दाव्यातील माझ्या वकीलांना सगळी माहीती दिली होती. त्या दाव्यातील दावा मिळकतींबाबत वाटपासंदर्भातील माहीती मी माझ्या वकीलांना दिली होती. ते वाटप कधी झाले, कोणत्या वर्षी झाले याबाबत मी माझ्या त्या दाव्यातील वकीलांना माहीती दिली होती.

प्रश्न- रे.मु.नं.७४६/२०११ मधील दाव्यात गट नं.३११, १२६, ७३८/१९ या जमिनी तुम्हाला वाटपात आल्याबाबत तुम्ही नमुद केले आहे?

उत्तर- त्या जमिनी मला वाटपात आलेल्या नाहीत. मी व रामदास एकत्र व्यवसाय करत होतो व मला रामदासने हिस्सा दिला नाही त्यामुळे रामदास व मोरेश्वरने मला

सुलेनामा करुन दिला.

प्रश्न- रे.मु.नं.७४६/२०११ मध्ये तुम्ही या दाव्यातील वादी व इतर प्रतिवादींना का सामील केले नाही?

उत्तर- रामदास व माझ्यामधील व्यवहार त्या दाव्यात होता. त्यामुळे त्यांना सामील करण्याचा प्रश्नच नाही.

प्रश्न- रे.मु.नं.७४६/२०११ मध्ये त्या दाव्यातील मिळकती वगळता तुम्ही या दाव्यातील मिळकती का सामिल केल्या नाहीत?

उत्तर- कारण त्या वडीलोपार्जीत मिळकती होत्या.

हे म्हणणे खरे नाही की रे.मु.नं.७४६/२०११ या दाव्याबाबत माहीती वादीला सन २०१६ साली जेव्हा वादीने नकला काढल्या तेव्हा वादीस झाली. हे म्हणणे खरे नाही की रामदास व माझ्या नावावर ज्या मिळकती होत्या त्याच मिळकती केवळ मी रे.मु.नं.७४६/२०११ मध्ये दाखल करुन मी व रामदास यांनी कोर्टाची दिशाभुल करुन हुकुमनामा मिळवला व जाणुनबुजुन मी या दाव्यातील मिळकती त्या दाव्यात सामील केल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की मी वादीला स्वतः कधी पैसे दिले नाही व वादी त्या रकमेवर त्रयस्थ इसमांकडुन त्या रकमा देवुन व्याज घेत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की रे.मु.नं.७४६/२०११ हा दावा आम्ही स्वखुषीने सुलेनामा करुन घेतल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की रामदासला ट्रान्स्पोर्टच्या व्यवसायात कर्ज झाले असल्याने मी त्याला रक्कम दिली असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की त्या रकमेच्या कर्जाकरीता दि.१.५.२००८ साली मी माझ्या स्वतःच्या मालकीचे घर, ऑफीस व ट्रक विकुन कर्ज फेडल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की घरखर्चापोटी व किराणा माल कपडेलत्ते औषधोपचाराकरीता माझ्याकडे पैसे शिल्लक नसल्याने मी घरभाडयापोटी वइतर खर्चापोटी मित्रमंडळीकडुन घेतलेले हातउसने रकमेचे ५८,६८,५००/- रुपयांचे कर्ज झाले असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की या सर्व दावा मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादींचा हिस्सा आहे. मी सांगतो की ४ मिळकतींमध्ये हिस्सा नाही. हे म्हणणे खरे नाही की रे.मु.नं.७४६/२०११ मधील हुकुमनामा मी व रामदासने दिशाभुल करुन घेतल्याने तो हुकुमनामा वादीवर बंधनकारक नाही. हे

म्हणणे खरे नाही की माझी कैफीयत व शपथपत्रातील कथने खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की केवळ हिस्सा द्यावा लागु नये म्हणुन मी खोटेशपथपत्र दाखल केले आहे.

उलटतपास संपला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

NILESH SHRIPAL SABNIS

Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2026.04.06 18:01:35 +0530

दिनांक : ०६/०४/२०२६

( डॉ.एन.एस.सबनीस )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारनेर